# कंठभूषणांपासून मेखलेपर्यंतचे अलंकार

## अलंकारांविषयीचे शास्त्र अन् सूक्ष्मातील प्रयोग !

### विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 मनोगत ८

卐 अलंकार विकत घेतांना घ्यावयाची काळजी १०

卐 ग्रंथात दिलेल्या सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या प्रयोगांची वैशिष्ट्ये ११


### ग्रंथाची अनुक्रमणिका


१. मंगळसूत्र (सौभाग्यालंकार) १२

२. हार ३०

३. साखळी ४२

४. मोत्यांची माळ ४३

५. गळ्यात घालावयाचे इतर अलंकार ४५

६. कटीसूत्र (कमरपट्टा) ४५

७. मेखला ५०

८. छल्ला ५५

९. आचारधर्मानुसार अलंकार त्या त्या स्थानीच घालण्यामागील महत्त्व विशद करणारे सूक्ष्मातील प्रयोग ६२

१०. अलंकारांशी संबंधित देवता, देवतेचा कार्यरत होणारा भाव, अलंकार परिधान करणाऱ्यातील आणि पहाणाऱ्यातील भाव ७५

११. आध्यात्मिक त्रास असणारे आणि नसणारे जीव यांना अलंकार परिधान केल्यामुळे तारक अन् मारक स्तरांवर होणारा लाभ ७५

१२. विविध अलंकारांमुळे जिवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रमाण ७६

# मनोगत

स्त्रीने मंगळसूत्र घातले की, तिला पातिव्रत्याचे सतत स्मरण राहून तिचा मातृभाव जागृत रहातो. ठुशी, लक्ष्मीहार यांसारख्या अलंकारांमध्ये स्त्रीलावण्य अधिक खुलून उठते. हिंदु संस्कृतीचे भूषण असलेले अलंकार न केवळ स्त्रीची शोभा वाढवतात, तर तिला आचारधर्मपालनाची उत्तम संधीही प्राप्त करून देतात. सध्याच्या कलियुगात व्यक्तीच्या सात्त्विकतेची पातळी घसरत असतांना हिंदु धर्मातील आचारपालनामुळे ती टिकवून ठेवणे सहज शक्य होते. मुळातच स्त्री पुरुषांपेक्षा अधिक भावनाशील असल्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांना वाईट शक्तींचा त्रास होण्याची शक्यता अधिक असते. यासाठी हिंदु धर्माने पुरुषांपेक्षा स्त्रियांना अधिक अलंकार प्रदान करून त्या माध्यमातून स्त्रियांचे वाईट शक्तींपासून रक्षण होण्याचा मार्ग सांगितला आहे. स्त्रियांनी विविध अलंकार धारण करण्याचे महत्त्व प्रस्तूत ग्रंथात केलेल्या शास्त्रीय विवेचनातून कळेल.

विविध अलंकार धारण केल्यावर ईश्वरी तत्त्व कसे ग्रहण होते, व्यक्तीचा आध्यात्मिक त्रास कसा न्यून (कमी) होतो इत्यादींविषयीची सूक्ष्म-स्तरावरील प्रक्रिया उलगडणाऱ्या सूक्ष्म-ज्ञानविषयक प्रयोगांचा अंतर्भावही ग्रंथात केला आहे. एखादी गोष्ट नुसती सांगण्यापेक्षा प्रयोगाद्वारे सिद्ध झाली, तर आपला लगेच त्या गोष्टीवर विश्वास बसतो. अलंकारविषयक प्रयोगांतून काढलेले निष्कर्ष हे अलंकारविषयक शास्त्रीय विवेचनाशी सुसंगतच ठरले आहेत. त्यामुळे साहजिकच अलंकारशास्त्राविषयी श्रद्धा वाढायला साहाय्य होते. या सूक्ष्म-ज्ञानविषयक प्रयोगांचे विवेचन करतांना आरंभीला आम्ही त्या त्या अलंकाराचे छायाचित्र दिले आहे. वाचकांनी त्या छायाचित्राकडे पाहून प्रयोग स्वतः करायचा प्रयत्न करावा, म्हणजे छायाचित्राकडे पाहून चांगले कि त्रासदायक वाटते अथवा एखादी अनुभूती इत्यादी येते का, ते पहावे आणि त्यानंतरच पुढील भाग वाचावा. यामुळे वाचकांचा सूक्ष्मातील अभ्यास होऊन अलंकार विकत घेतांना ‘तो सात्त्विक कि तामसिक आहे’,

हे ओळखता येण्यास साहाय्य होईल.

या ग्रंथाच्या वाचनाने अलंकारधारणाचे महत्त्व लक्षात येऊन अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानताही लक्षात यावी, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## अलंकारांची आध्यात्मिकदृष्ट्या शुद्धी करण्याचे महत्त्व

अलंकार परिधान करण्यामागे सौंदर्यवृद्धीपेक्षा आध्यात्मिक लाभ हा उद्देश अधिक महत्त्वाचा आहे. अलंकार परिधान केल्याने शरिराच्या त्या त्या ठिकाणी वाईट शक्तींना शरिरात प्रवेश करण्यास प्रतिबंध होतो. सोने-चांदीच्या सात्त्विकतेमुळे हा परिणाम साधला जातो. यामुळेच वाईट शक्ती अलंकारांना विरोध करतात आणि त्यांच्यावर काळे आवरण आणतात. हे सूक्ष्मातून घडत असल्याने ते सामान्यांना डोळ्यांनी दिसत नाही आणि 'अलंकार स्वच्छ आहेत', असे वाटते; पण प्रत्यक्षात तसे नसते. त्यामुळे अलंकार नियमितपणे स्थूल आणि सूक्ष्म दृष्ट्या (आध्यात्मिकदृष्ट्या) स्वच्छ करणे गरजेचे आहे. अलंकार रिठ्याने (स्थुलातून) स्वच्छ करतांना त्यांवरील काळे आवरण जाण्यासाठी प्रार्थना करावी अन् त्यांना विभूती लावून ते धुवावेत. वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांनी अलंकार प्रत्येक आठवड्याला अशा पद्धतीने स्वच्छ करावेत आणि नसलेल्यांनी ते प्रत्येक महिन्याला स्वच्छ करावेत. **(संदर्भ : सनातनचा ग्रंथ 'अलंकारांचे महत्त्व')**

**सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !**

मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे आणि ग्रंथांची संरचना 'इन्डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे, या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा – (०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com